# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/०८/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :— दिनांक १६/०२/२०१९ चे ०८.१३ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. ११३/२०१९ कलम ३६३, ३७६(डी) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १५/०२/२०१९ चे २१.३० वा. ते २२.०० वा. सुमारास आरोपी क्र. १. मयुर यशवंत कुल्लरकर, वय २१ वर्ष, रा. खरात पूर्नवसन मारोडी ता. मौदा जि. नागपूर याने फिर्यादी/पीडित मुलगी वय २२ वर्ष, हिला फोन करून बोलावुन घेवुन तिला मारोडी बसस्टाप जवळील चरडे यांच्या पाणठेल्याचा मागे नेउन बळजबरीने दारू पाजुन तिच्या सोबत जबरीने संभोग केला. त्यानंतर आरोपी क्र. १, २) राहुल कांबळी वय २५ वर्ष रा. खराडा पुर्नवसन मौदा, ३) शाम कातोरे, वय १९ वर्ष रा. मारोडी ता मौदा व विधीसंघर्ष बालक यांनी तिला जबरदस्तीने आरोपी क्र. २. राहुल कांबळी याचे झायलो जिपमध्ये बसवुन इकडेतिकडे फिरवून मारोडी पूलावर आणून सोडून दिले. आरोपीला दिनांक १६/०२/२०१९ चे १४.२० वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सपोनि श्री. मस्के, पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २२/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश शंडे मॅडम, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. १) यास कलम ३७६ भादंवि. कायद्यान्वये १० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानी प्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा, विकास वाटकर यांनी मदत केली आहे.

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :— दिनांक १८/०२/२०१९ चे ००.२६ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप. क्र. १२०/२०१९ कलम ३०६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १७/०२/२०१९ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादीची मुलगी/मृतक वय २२ वर्षे हिच्यावर दिनांक १५.०२.१९ चे रात्रीचे २१.३० ते २२:०० वा. दरम्यान आरोपी नामे— मयुर यशवंत कुल्लरकर, वय २१ वर्ष, रा. खरात पूर्नवसन मारोडी ता. मौदा जि. नागपूर याने दारू पाजुन जबरी संभोग केला होता. त्यावरून पो. स्टे.मौदा येथे जबरी संभोगचा गुन्हा अप क्र. ११३/२०१९ नोंद करण्यात आला. सदर घटनेवरून यातील मृतक हि निराश होती. याकारणावरून तिने तिचे राहते घरी सिलींग फॅनला साडीने गळफास घेउन आत्महत्या केली. आरोपीला दिनांक १९/०२/२०१९ चे १४.३७ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोनि श्री. खराबे, पो.स्टे. मौदा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा.कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २२/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश शंडे

मॅडम, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. १) यास कलम ३०६ भादंवि. कायद्यान्वये ४ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. तसेच आरोपी क्र. २) राहुल कांबळी वय २५ वर्ष रा. खराडा पुर्नवसन मौदा, ३) शाम कातोरे, वय १९ वर्ष रा. मारोडी ता मौदा व विधीसंघर्ष बालक यास निदोर्ष रिहा करण्यात आले आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. भोयर, श्री घाडगे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानी प्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा, विकास वाटकर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर